"आपले मंडळ"

|| Maharashtra Mandal of Detroit ||

# स्नेहबंध

दिवाळी विशेषांक

नोव्हेंबर २०१७

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.
Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LHG
Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL
Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षीय | अनघा हुपरीकर | पान 4 |
| २ | खेळ मांडीयेला वाळवंटी | सुरेश नायर | पान 6 |
| ३ | खेळ | प्रसाद कुलकर्णी | पान 9 |
| ४ | देवबाप्पा | सुशांत खोपकर | पान 11 |
| ५ | तुझ्याबीन लहरी | निरंजन हुंबड | पान 15 |
| ६ | साधं, सहज आयुष्य मी जगतो | Vedanti Pargaonkar | पान 17 |
| ७ | Khatri Sir and Gymnastics | Nitin Anturkar | पान 18 |
| ८ | 'ब्रिज' याने की पूल - खेळातला आणि मैत्रीतला | संजय मेहेंदळे | पान 22 |
| ९ | मैदान | ऋतूज देशपांडे | पान 24 |
| १० | कृष्णा | शमा सुखटणकर | पान 25 |


**संपादक**
ऋतूज देशपांडे
सुशांत खोपकर
ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ रचना व मांडणी**

मानसी डहाणूकर

## लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना

संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. *लेखांतून* व *चित्रांतून* व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा,
ही विनंती!

## अध्यक्षीय

**नमस्कार मंडळी**,



महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटच्या दिवाळी कार्यक्रमात सर्वांचं स्वागत!! 'वर्ष २०१७' आपल्या मंडळाच्या आयुष्यातील एक महत्वाकांक्षी आणि अत्यंत अभिमानास्पद ठरलेलं असं हे वर्ष!! का, ते आपण सगळे जाणतोच; आपण सर्वांनी मिळून यशस्वीरीत्या पार पाडलेलं बृहन्महाराष्ट्र मंडळाचं १८ वं अधिवेशन!! गेली २ वर्षं सर्व कार्यकर्ते एकाच ध्येयाने झपाटल्यासारखे काम करत होते. ते बघताना आपल्या मंडळाच्या सभासदांमधील, कार्यकर्त्यांमधील एकजूट आणि strength जाणवण्यासारखीच होती.

हे वर्ष विशेष असल्याने मंडळाचे २०१६ चे अध्यक्ष, तुषार सामंत, यांनी जुलै २०१७ पर्यंत आणि अधिवेशनानंतर मी अध्यक्षपदाची सूत्रे हातात घ्यावी असं विश्वस्त मंडळात सर्वानुमते ठरवण्यात आलं. एवढं यशस्वी अधिवेशन पार पडल्यानंतर मंडळाचा कारभार तितक्याच परिणामकारकरित्या पेलणं साहजिकच आव्हानात्मक होतं. त्यामुळे खरं तर जरासं दडपणच आलं. जेंव्हा एक कार्यकर्ती म्हणून काम करत होते, तेंव्हा आपल्याला दिलेलं काम चोखपणे करायचं आणि जिथेही मदत लागेल तिथे करायची, एवढंच माहिती होतं. पण अध्यक्ष म्हणून सर्व बाजूंनी कार्यक्रमांचा विचार करायचा हे शिकायला आणि अंगवळणी पडायला थोडासा वेळ लागणार याची कल्पना होती. आपलं विश्वस्त मंडळ आणि सर्व अनुभवी सभासद यांचा सतत पाठिंबा व मार्गदर्शन असल्यामुळे ही learning process खूपच सोप्पी झाली. त्यासाठी मी त्या सगळ्यांचे कितीही आभार मानले तरी कमीच आहेत.

बघता बघता आता वर्ष संपतही आलं. आपली वार्षिक सहल नेहमीप्रमाणेच स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेत, हसत-खेळत, गाणी म्हणत उत्तम पार पडली. त्यांनंतर वर्षातला Most Awaited कार्यक्रम म्हणजे आपला केवळ लहान मुलांचा समावेश असलेला गणपती कार्यक्रम २०१७, 'झंकार' ही नावाला साजेसाच झाला. त्यामध्ये आपल्या Youth Committee चा समावेश लक्षणीय होता. सप्टेंबर मध्ये आपण राहुल देशपांडे यांचा शास्त्रीय आणि सुगम संगीताचा कार्यक्रमही केला. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला. या तीनही कार्यक्रमांमध्ये मला प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे खूप नवीन चेहरे. काहींनी भेटून सांगितलं देखील की त्यांना मंडळात येऊन खूप बरं वाटलं आणि ते आता कायम येत राहतील. खूप आनंद झाला बघून की इथे येणाऱ्या प्रत्येक मराठी माणसाला मंडळाकडे यायची ओढ आहे. याहून जास्त काय हवं!!

त्यानंतर आली कोजागिरी. कोजागिरी म्हटलं की आपोआपच मनात येतं 'मसाला दूध आणि जोडीला सुरेल गाणी'!! अगदी तशीच मंडळाची कोजागिरी साजरी झाली. 'रस बरसे' या नवरसांवर आधारित मराठी-हिंदी गाण्यांच्या अत्यंत सुरेल कार्यक्रमाने प्रेक्षकांना मोहित केलं.

आज आता वर्षातला आपला शेवटचा कार्यक्रम, दिवाळीचा. 'शांतेचं कार्ट चालू आहे' हे भारतातून आलेलं धम्माल विनोदी नाटक, आपले MMDian मित्र-मंडळी, रुचकर जेवण आणि फराळाने कार्यक्रमाची लज्जत वाढणार ह्यात शंकाच नाही.

२०११ मध्ये मायदेशाहून इथे आले तेव्हा एकाही व्यक्तीला न ओळखणाऱ्या मला, आपल्या मंडळाने केवढं मोठं कुटुंब देऊ केलंय. हे ऋण फिटण्यापलीकडचे आहेत. या ऋणानुबंधात मला कायम राहायला आवडेल आणि म्हणूनच अध्यक्षपद स्वीकारून मंडळाच्या प्रसाराला, प्रगतीला हातभार लावायचं मी ठरवलं. २०१८ साठीही कार्यकारिणी समितीच्या मदतीने उत्तमोत्तम कार्यक्रम देण्याचा आपला प्रयत्न चालूच राहील. यात तुम्हा सर्वांची मला साथ असेल अशी मी अपेक्षा करते. तुम्हाला काहीही प्रश्न असतील, सूचना असतील तर त्या मला जरूर कळवा.

**आपली विश्वासू,**

**अनघा हुपरीकर**

**अध्यक्ष,** महाराष्ट्र मंडळ, डेट्रॉईट २०१७



# खेळ मांडीयेला वाळवंटी

वाळूची पोती, सिमेंटचे ब्लॉक्स आणि खणलेले चर याचा आधार घेत, अहोरात्र दोन्ही बाजूंनी बंदुकीच्या फैरी झडत होत्या. तासाभराची म्हणून उसंत नव्हती. अचूक निशाण घेऊन कुणाला वर्मी मारणे हे फक्त आधी थोडे दिवस सुरु होते. नंतर नंतर बहुतेक बंदुकीचे बार हे फक्त "खबरदार एक पाउल पुढे टाकले तर" असा दम भरण्यासाठी होते. दिवस रात्र पाळत होती. दिवसाच्या रणरणत्या उन्हात वाळू तापून वाफेचे झोळ निघत राहायचे. इथे तिथे थोडसं गवत यापलीकडे बाकी सर्व वैराण होतं. छोट्या छोट्या टेकड्या आणि त्यामध्ये उतरण असा प्रदेश आणि त्याच्या अल्याड पल्याड दोन्ही सैन्याचे तळ. काही ठिकाणी तर दोन्ही सैन्यात फक्त मोजक्या फर्लांगाचं अंतर होतं. अश्या उघड्यावर दिवसा पुढे येऊन शत्रूची फळी तोडणं अशक्यप्राय होतं. म्हणून दिवसा त्यातल्या त्यात जरा कमी फैरी झडत. पण रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन कुणी काय करेल याचा भरवसा नव्हता. म्हणून रात्री विशेष जागरूक रहावं लागायचं.

खरंतर नियमानुसार ठराविक काळाच्या अंतराने, विश्रांती देण्यासाठी पुढच्या फळीची तुकडी मागे पाठवून तिच्याजागी दुसरी तुकडी यायची. यामुळे नेहमी उत्साह आणि जोर टिकून असायचा. पण यावेळी सीमेच्या बऱ्यापैकी मोठ्या भागावर एकाच वेळी गोष्टी तापल्या होत्या. सगळीकडचं वातावरण एकदम तंग होतं. म्हणून आहे तीच तुकडी एका जागी अनेक महिने आपला जम धरून होती. दिवसा काय तो आळीपाळीने आराम व्हायचा पण रात्री सर्वांनाच आपापल्या बंदुकी आणि जागा सरसावून सतर्क रहावं लागायचं. अर्थात ही परिस्तिथी दोन्ही कडे लागू होती.



अधून मधून नुसता आवाज आणि आरोळ्यावरून दोन्हीकडून एकमेकांना खबरदारीचा इशारा जायचा. एखादा सैनिक जोरात ओरडून देशभक्तीपर घोषणा द्यायचा. मग त्याला साथ देत आणखी सैनिक आपला आवाज मिसळायचे. मग दुसऱ्या बाजूने तसाच कल्लोळ माजायचा आणि कितीतरी वेळ कंटाळा येईपर्यंत हेच चालायचे. काही दिवसांनी असा 'खबरदारीचा इशारा' या ऐवजी 'वेळ जाण्यासाठी'' म्हणून एक प्रकारचा खेळ होऊन बसला होता. मग देशभक्तीपर घोषणांच्या जागी देशभक्तीपर गीते, मग नुसतीच गीते (पण एकदम जोशदार) असं चालायचं. पलीकडच्या बाजूचे कुणाकुणाचे आवाज सुद्धा ओळखीचे व्हायला लागले होते आणि त्यांना काल्पनिक, बऱ्याचदा गचाळ, शिवियुक्त नावे सुद्धा देण्यात आली होती. कुणी डुक्कर, कुणी हराम कि औलाद तर कुणी त्यापेक्षा वाईट काही.

शांतीच्या काळात वर्षातून काही ठराविक प्रसंगी, म्हणजे एकमेकांचे सर्वात महत्वाचे सण किंवा स्वातंत्र्य दिवशी म्हणा, दोन्ही बाजूंनी भेटवस्तू व रुचकर खाद्यपदार्थ-मिठाई यांची देवघेव व्हायची. हे खूपच शिस्तबद्ध पद्धतीने व बऱ्याच नियमांचे पालन करून व्हायचं. आणि फक्त वरच्या पातळीचे अधिकारी यात सामील असायचे. सामान्य सैनिकांना एकमेकांशी फारशी सलगी करण्यास सक्त मनाई होती आणि अर्थात तशी संधी सुद्धा नव्हती. पण तरीही काही अर्थी याचा परिणाम होऊन जरासा सलोख्याचा भाव यायचा आणि थोडे दिवस का होईना बंदुका शांत व्हायच्या. पण गेल्या वर्षापासून पेटलेले युद्धाचे वारे अजून शांत व्हायची जराही चिन्हे दिसत नव्हती. राजकीय स्तरावर बोलणी, अंतरराष्ट्रीय देशांची मनधरणी, दटावणी, व मध्यस्ती असे सर्व प्रकार चालू होते. पण इथे, खऱ्या मैदानावर, जो जीवघेणा खेळ चालू होता त्याच्या समाप्तीची लक्षणे अजून केल्या दिसत नव्हती. अश्यात भेटी आणि मिठाई देण्याचा रिवाज मागे न पडला तर नवल. अहोरात्र दोन्ही बाजूंनी बंदुकीच्या फैरी मात्र झडत होत्या.

जसजसे दिवस जात होते तसतशी छावणीत काहीशी अस्वस्थता वाढत होती. सैन्याची सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, बरोबर कि चूक याचा विचार न करता, वरून आलेला नियम अचूक पाळणे. अधिकाऱ्यांसमोर कसलीच तक्रार किंवा साधी कुरकुर सुद्धा करायचा विचार कुणाच्या मनात नव्हता. स्वतः सैन्याचे अधिकारी राजकीय घडामोडींच्या आणि निर्णयांच्या अधीन होते. पण तरीही वस्तुस्तिथी अवघड होती. सुट्टी रद्ध झाल्यामुळे कुणाची लग्नाची तारीख येऊन गेली होती, कुणाच्या घरात कधीचा पाळणा हलता झाला होता, कुणाला जवळच्या माणसाच्या शेवटच्या क्षणी जवळ राहता आलं नव्हतं. जवळच्या सगेसोयरे,

मित्रमंडळी यांच्याशी साजरा करायचे वाढदिवस, सण वगैरे सर्व प्रसंग निसटून जात होते आणि या सर्वांचा अंत कुठे दिसत नव्हता.

आज वर्षाचा अखेरचा दिवस होता. मध्यरात्र उलटली कि नवीन वर्ष. जगभरात हा प्रसंग साजरा करायची आता एक परंपराच झाली होती. धर्म-जात-पात-भाषा, गरीबी-श्रीमंती या कशा कशाला न जुमानता जो तो जाणाऱ्या वर्षाला सलाम करीत नवीन वर्षाचं स्वागत करायला उत्सुक असतो. जणू काही आपल्या अपुऱ्या इच्छा, आकांक्षा येत्या वर्षात पुऱ्या होतील, किंवा किंबहुना व्हाव्यात अशी अपेक्षा करीत, सर्वांसोबत साजरा करायचा दिवस. इथे मात्र, गेल्या कित्येक महिन्यांच्या घटनांवरून हाही एक असाच निसटून जाणारा दिवस, अशी भावना होती. सकाळी कवायतीच्या वेळी एकमेकांना "संध्याकाळची पार्टी विसरू नका ", "खूप मजा करू" वगैरे उपहासात्मक शेरे दिले जात होते. एकूण नेहमीपेक्षा जरा जास्तच चैतन्य कमी होतं.

मग बातमी आली कि चोवीस तासाचा सीजफायरचा समझौता झालाय. आज दुपारी बारा ते उद्या दुपारी बारा पर्यंत दोन्ही बाजूची शस्त्रं शांत राहतील. खूप दिवसापासून सुरु असलेल्या राजकीय प्रक्रियेला गती मिळाली होती. एका बहुराष्ट्रीय परिषदेत महत्वाची बोलणी होणार होती आणि लढाई पूर्णपणे संपण्याची पुरेपूर खात्री वाटत होती.

या बातमीने सगळीकडे एकदम जल्लोष उठला. सुकलेल्या रोपाला पाणी घातल्यावर ते तरारून उठावं तशी सगळ्यांची अवस्था झाली. एकूण रंग पाहून वरच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा संध्याकाळी न्यू इयर पार्टीला परवानगी दिली. गावातून एक खानसामा बोलावून खास जेवणाचा बेत आखण्यात आला. नेहमीपेक्षा मद्याचा कोटा वाढवला गेला. राष्ट्रीय झेंड्या सोबत इकडे तिकडे थोडेबहुत रंगीत कागद वगैरे सुद्धा फडकू लागले. कुणीतरी दिव्याची माळ लावली. संध्याकाळ होईस्तोवर वातावरण पूर्ण बदलून गेले होते.



हळू हळू जमवा जमव सुरु झाली. चियर्सच्या आवाजात काचा एकमेकांना भिडू लागल्या. गप्पा टप्पा, विनोद आणि त्यावरून उठणारे हास्याचे फवारे उठू लागले. अधेमध्ये पलीकडच्या बाजूने देखील तसेच आवाज कानी येत होते. गेल्या कित्येक दिवसांचे चिंतेचे ओझे जणू गळून पडले होते आणि एक निश्वासाचे, आशेचे, हलकेपणाचे असे विश्व तयार झाले होते. मधेच कुणीतरी खिशातून मौथ ऑर्गन काढला आणि एक हलकीशी धून हवेत उठली. त्यात मग शब्दांची भर पडली आणि सूर उठले. पण आजचे सूर जोशिले, रखरखीत नव्हते तर आनंदी, आतुर असे होते. अर्थात सगळेच काही या सोहळ्यात सामील नव्हते. अजून ठिकठिकाणी पाळत होती, बंदुका सज्ज आणि सावध होत्या, फक्त नेहमीच्या इतक्या संख्येत नव्हत्या.

तास दोन तास असेच गेले. जेव्हा पार्टी सुरु झाली तेव्हा सर्वांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली होती. खूप दिवस अंधारात राहिल्यावर उजेडाची सवय व्हायला वेळ लागतो, त्याचा त्रास होतो तसं झालं होतं. मग हळू हळू त्यात ढील पडली, हलकेपणा आला, आणि सर्वजण खऱ्या अर्थाने पार्टीचा आस्वाद घेऊन लागले. आणि तेवढ्यात धपकन आवाज आला. कुठ्न, कसला ते समजायच्या आत जो तो क्षणार्धात सावध अवस्थेत गेला. रातकिड्यांच्या आवाजाखेरीज सगळीकडे चीडीचाप शांतता पसरली. आणि कुणाचंतरी लक्ष एकदम मध्ये पडलेल्या एका फुटबॉल कडे गेले. त्याने नुसताच इशारा करून दुसऱ्यांचं लक्ष त्याच्याकडे वेधून घेतलं. कुणीच काही हालचाल केली नाही. इतक्यात टेकाडाच्या पलीकडून आवाज आला " हरामी साला, अक्कल नाही. सांगितलं जपून कुठे मारतोय तिकडे लक्ष दे, तर नाही!. तुझ्या कॉलेजचं मैदान वाटलं का कुठेपण बॉल मारायला. आता अंधारात शोधणार कुठे. आणि सापडला नाही तर खेळणार काय? एकच तर होता" आणि असेच बरेचसे कुरकुरते स्वर ऐकू येऊ लागले.

इतका वेळ रोखून धरलेले श्वास आता सुटले. शरीरं ढिली पडली. जराशी हालचाल सुरु झाली. मग घोळक्यात एकमेकांशी जरा कुजबुज झाली. आणि एकजण जोरात ओरडला " फुटबॉल शोधताय का ? इथे आमच्याकडे आलाय ". आता पलीकडची बाजू मघासारखी शांत पडली. दाट धुकं साचावं तशी हवा दाटून आल्याचा भास होत होता. ऐन लढाईच्या वेळी जितका तणाव कधी जाणवला नाही तितका आता जाणवत होता. मग पलीकडून उत्तर आलं "हो, आमचा बॉल आहे. आम्ही काहीजण

नुसतेच खेळत होतो". त्यासरशी एकाने "होशियार, पाचच्या काउंटला बॉल येतोय" अशी आरोळी देत एक, दोन, तीन, चार मोजले आणि पाचला एक जोरदार किक मारून बॉल, जिथून आवाज आला तिथे परतवला. पलीकडून एकच आवाज उठला आणि कुणीतरी "खूप खुप धन्यवाद" असे ओरडले.

मग हळू हळू दोन्हीकडून एक संवाद सुरु झाला. आधी 'हैपी न्यू इयर" अश्या शुभेच्छा एकमेकांना दिल्या गेल्या. मग ""पार्टी कशी चालली आहे" वगैरे झाले. खायला पदार्थ काय, प्यायला काय याचीही चौकशी होऊन गेली आणि उगाच "अरेरे आम्हाला पण ते खायला, प्यायला आवडलं असतं" वगैरे झालं. नंतर काय बोलावे ते कळेना पण काहीतरी दुवा जुळला होता तो तसाच सोडून जावं असं कुणाला वाटत नव्हतं. मग एकजण ओरडला "अरे सिझफयार आहे, शस्त्रं चालवायची नाही असा हुकुम आहे मग प्रत्यक्ष एकमेकांची तोंडे तरी बघुयात. पुन्हा मौका मिळणार नाही". त्यासरशी पुन्हा शांतता पसरली, तणाव जाणवला. आणि मग आवाज आला "चालेल पण हात रिकामे नको, तुमच्याकडचे चमचमीत पदार्थ घेऊन या" आणि त्यासरशी हशा पिकला. मग दोन टेकाडाच्या मधून जिथे मोकळी मैदानासारखी जागा होती त्याच्या दोन्ही बाजूच्या सीमारेषेवर सर्व जमले. दोन्हीकडचे एकदोन जवान धाडस करून पुढे सरसावले आणि हळू हळू पावले टाकीत मध्यभागी आले. पुढे येउन एकमेकांचे हात हाती घेत शुभेच्छा दिल्या. तसे इतरही जवान पुढे आले. काही जणांनी खरंच काही खायचे पदार्थ, सिगारेट्स वगैरे भेटी आणल्या आणि एकमेकांना दिल्या. नावेगावे याची अदलाबदल झाली. तुटपुंजी का होईना ओळख जमली.

माणुसकीचा एक अभूतपूर्व सोहळा अगदी आपसूक, न सांगता, न ठरवता या रात्री इथे वाळवंटात घडत होता. ओळखीच्या आवाजाला आज चेहरे आणि नावे आली होती. सीमा पुसट झाल्या होत्या. सर्वांना माहित होते की जे होतं ते अल्पकाळा करताच होतं. त्याला खूप काही महत्व नव्हतं. उद्या कदाचित बातमी येईल कि सलोखा झालाय, युद्ध संपलंय पण तेही नेहमीचेच टिकेल याचा नेम नाही. याआधीही अनेकदा भडका उडालाय, त्यावर पाणी पडलंय आणि पुन्हा भडका उडालाय. आणि कदाचित बातमी येईल कि बोलणी मोडून पडली. पुन्हा लढाईला सुरवात होउदे. पुन्हा तोफा डगडगू द्या. पुन्हा आपआपली शस्त्रे हातात घ्या. मात्र यावेळेला गोळी झाडताना पलीकडच्या वाळूच्या पोतींच्या आड, रात्रीच्या अंधारात दिसलेला एखादा चेहरा असल्याचा भास होईल. आणि मध्ये दम घेताना पेटवलेली सिगारेट, कुणी दिलेली भेट असेल. पण हे सर्व कदाचित नंतर आठवेल. ऐन निर्णयाच्या वेळी कर्तव्यात रुजलेली बोटे मात्र बंदुकीचा चाप ओढताना अजिबात अडणार नाहीत.

जशी जमली तशी हळू हळू पांगापांग सुरु झाली. एकमेकांचा निरोप घेत सारे एकेक करून मागे फिरू लागले. मधलं मैदान पुन्हा रिकामं झालं. अनेक पावलांच्या ठश्यांच्या रेघोट्या मात्र सर्वत्र येता जाताना दिसत होत्या. आणि अधून मधून, इथे तिथे फक्त पुसटश्या आवाजात ऐकू येत होतं "हैपी न्यू इयर दोस्त, हैपी न्यू इयर"

\- सुरेश नायर

# खेळ

खो-खो , कबड्डी खेळलो ..
लंगडीही कधी घातली ..
फुटले इथेच गुढगे ,
ठेचंही तेंव्हा लागली .....

काळ, वेळही निरर्थक तसे ,
जेंव्हा क्रिकेटची बॅट दिसे ...
फुटता खिडकी शेजारी मात्र ,
दिवसाही आम्हा तारे दिसे .....





खेळ सारे खेळताना ,
उन्हा-पावसाची तमा नसे ..
भांडण तंटे कितीक झाले,
पण मैत्रीला कधी तडा नसे ....

बालपणीचा काळ सरता,
खेळही मागे पडले तसे .....
पण .. आजही ती मैदाने पाहता,
त्याच आठवणी फिरुनी स्मरे ...

खेळणे मन प्रसन्न केले,
आरोग्याचे दान दिले ....
आयुष्याच्या खेळामध्ये,
या खेळांचे महत्व खरे.

प्रसाद कुलकर्णी






Together, we can
raise expectations.
Let's expect more of ourselves. Let's expect more of one another.
Let's come together to accomplish more, together.
At Comerica Bank, we applaud you for raising expectations
of our diverse community.
Comerica Bank
RAISE YOUR EXPECTATIONS.
MEMBER FDIC. EQUAL OPPORTUNITY LENDER.

# देवबाप्पा

आस्तिकतेच्या आणि नास्तिकतेच्या मध्ये असलेल्या अदृष्य रेषेवर माझं मन नेहेमी रेंगाळत असतं. आणि ते फक्त रेंगाळतच नाही, तर चक्क तळ्यात-मळ्यात खेळत असतं! ती रेषा अदृष्य यासाठी की आस्तिक म्हणावं, तर देव आणून दाखवता येत नाही. तो आपल्याच दिसत नाही, तर आणणार कुठून! आणि नास्तिक म्हणावं, तर आपलं विज्ञान अजून एवढं प्रगत नाहीये, की देवाविना मनाच्या कुतूहलाची तहान भागवता येईल!

मला नेहेमी वाटतं की संस्काराच्या नावाखाली आई-बाप त्यांच्या मुलांना गंडवत असतात! म्हणजे, लहानपणी आयुष्याचं अगदी गोजिरं रूप दाखवलं जातं. तेव्हा आयुष्याचे नियमही खूप साधे असतात. 'चांगलं वागलं, की देवबाप्पा खूश होऊन बक्षीस देतो आणि वाईट वागलं, की देवबाप्पा शिक्षा करतो.' 'आपले आजोबा खूप म्हातारे झाले होते की नाही, मग देवबाप्पाने त्यांना बोलवून घेतलं. आता ते देवबाप्पाकडे असतात.' रोज संध्याकाळी देवापुढे दिवा लावल्यावर 'शुभम् करोति' म्हणा, शाळेत अथर्वशीर्ष म्हणा, १२वा, १५वा अध्याय म्हणा, रामरक्षा म्हणा. आपले आई-बाबा आपलं लहानपण अगदी देवबाप्पामय करून टाकतात! देवबाप्पा आपल्याच कुटुंबाचा एक परमोच्च सदस्य असतो. अगदी Highest Authority! आणि वरच्या मजल्यावर जावं तसे आपले आजोबा त्याच्याकडे गेलेले असतात..!

लहान असताना माझा देवावर अगदी विश्वास होता. परीक्षेच्या आधी न चुकता त्याला नमस्कार करून जायचो आणि देवाची आपल्यावर कृपा आहे म्हणूनच आपल्याला पेपर चांगले जातात, असा शाळेतल्या प्रत्येक पोट्या-सोट्यासारखाच माझाही समज होता. रस्त्यावरून जाताना मंदिर दिसलं की नमस्कार करायची मला तेव्हा सवयच लागली होती. एकदा आम्ही गाडीतून परगावी चाललो होतो. त्या प्रवासात एक रस्ता असा होता, की त्याच्या दोन्ही बाजूला तुरळक लोकवस्त्या अधून मधून लागायच्या. लोकवस्ती लागली, की त्यात दर १० सेकंदाला डावीकडे किंवा उजवीकडे एकतरी छोटंसं मंदिर असायचंच. आणि धावत्या गाडीत मी एकही मंदिर चुकू नये म्हणून दोन्हीकडे बघून पटापट नमस्कार करत होतो. अशाच एका मंदिराला मी नमस्कार केला आणि मला थोडीशी शंका आली. म्हणून मी मागे वळून बघितलं तर ते मंदिर नव्हतं, मुतारी होती! आणि घाईघाईत चक्क मी त्या मुतारीला नमस्कार केला होता!



जसे जसे आपण मोठे होतो, तसं तसं आपल्याला येड्यात काढलंय हे कळायला लागतं! B.Com, M.Com होऊन बँकेत नोकरी करणारा बाप आपल्या 'हुशार' मुलाला Science ला घालून पुढे Engineering ला पाठवतो. आणि विज्ञानाची कास धरलेल्या त्या मुलाच्या मनात, रंगलेली मेंदी जशी हळू हळू विरून जाते, तशी देवबाप्पाची छबी पुसत जाऊन अस्पष्ट होऊ लागते. आणि मनी पसरते ती नास्तिकता... ज्ञानाच्या सक्तीमुळे म्हणा, ज्ञानाच्या अभिमानामुळे म्हणा किंवा गर्वामुळे म्हणा.. आणि मीही ह्याला काही अपवाद नव्हतो.

मी देवाचं नाव घेणं खरं तर शाळेत असतानाच बंद केलं होतं आणि आस्तिकतेतून पूर्ण नास्तिक होऊन सुद्धा माझ्या आयुष्यात अगदी काहीच फरक पडला नाही! ना त्या देवाचा प्रकोप झाला, ना मला काही शिक्षा मिळाली, ना माझं खूप काही वाईट झालं. अगदी खूप काही चांगलं झालं अशातलाही भाग नव्हता. म्हणजे नास्तिक होऊन मला काही फायदाही झाला नाही. ह्याचाच अर्थ, आपला देवावरचा विश्वास हा 'no profit – no loss' या तत्वावर काम करतो, हे मला समजलं!

तर जेव्हा 'देव नाहीच आहे' आणि 'Science च खरं रे' ह्या मताचा मी होतो, तेव्हा गणपतीत आरती झाल्यावर नमस्कार करून डोळे बंद करून मी बाप्पाला म्हणायचो, "हे बघ गण्या, तुला माहितीच आहे, की आता काही माझा तुझ्यावर विश्वास नाहीये. पण मला लहानपणापासून तुला नमस्कार करायची सवय लागलीय म्हणून मी करतोय. मी तुझ्याकडे काही मागत नाही. पण जर का तू खरंच असशील(!), तर या बाकीच्या लोकांनी जे काही मागितलंय ते त्यांना देऊन टाक!' देवालाच नमस्कार करून त्याच्याशीच गप्पा मारताना त्यालाच म्हणायचं, की 'तू नाहीच आहेस, मला माहितीय!' ह्यातला वेडेपणा, निरागसता आणि सौंदर्य कळायला अजून ५-६ वर्षे लागली!

अजून थोडा मोठा झाल्यावर जेव्हा देव आणि धर्म ह्यातला संबंध कळला, आणि 'धर्म' ह्या अतिशय फोल गोष्टीवर चाललेला मुर्खपणा समजला तेव्हा तर देवाचा अक्षरशः रागच आला. लोकं टोळक्यांना आणि टोळकी समाजाला जोडली जावीत आणि समस्त मानवजातीचा वेगाने विकास व्हावा म्हणून आपल्या थोर पूर्वजांनी 'देव' ही संकल्पना समाजात रुजवली. त्यांचा हेतू चांगलाच होता. फक्त



निसर्गाची चूक एवढीच झाली, की एकाचवेळी असे वेगवेगळे दैदिप्यमान नेते जगाच्या वेगवेगळ्या ठिकाणी तिथल्या जनसमुदायाला 'देव' म्हणजे काय ते सांगत होते. ते जर तेव्हा एकमेकांना ओळखत असते, telecommunication, transportation तेवढं विकसित असतं, तर कदाचित problem आलाच नसता. पण झालं असं, की त्या प्रत्येक नेत्याने देवाचं एक वेगळं चित्र उभं केलं. त्यातून पुढे 'तुझा देव खरा का माझा' किंवा 'हिंदू खरा, मुसलमान का ख्रिश्चन' यावरून भांडणं होतील, दंगली होतील, एकमेकांचे गळे कापले जातील, हे त्या बिचाऱ्या साधू-संतांच्या ध्यानी-मनीही नव्हतं. आजही विव्हळत असतील त्यांचे आत्मे.. स्वर्ग असेल तर स्वर्गात आणि जर नसेल तर त्यांच्या शरीराच्या राखेने सुपीक झालेल्या जमिनीतही आज भितीने पिकं येण्यास कचरत असतील.. पण धर्म हा समाजासाठी असतो तर देव हा प्रत्येकासाठी. आज मी अशी बरीच लोकं बघतो, जी धर्मांध मुळीचं नाहीयेत. पण देवावर मात्र त्यांचा विश्वास आहे. 'देव सहकारी बँकेत' त्यांची personal accounts आहेत! त्यामुळे देवावरचा राग आता माझा निवळला आहे..

काही वर्षांपूर्वी मी इथं अमेरिकेला आलो, आणि मला एका वेगळ्याच देवाने दर्शन दिले! असं म्हणतात एखादी गोष्ट आपल्या आयुष्यातून निघून गेली, की त्याची आपल्याला किंमत कळते. त्याचीच प्रचीती पुन्हा एकदा आली. इकडे पहिल्यावर्षी गणपती आले आणि उत्सवाविनाच निघूनही गेले. गणपतीची ती प्रसन्न मूर्ती नव्हती. छोटासा उंदीर नव्हता. आरास नव्हती. मोदक नव्हते. तबकातला जळणारा तो कापूर नव्हता. आरत्यांचे स्वर नव्हते. ढोल ताशांचे घुमणारे आवाज नव्हते. गुलाल नव्हता आणि लयीत नाचणारी पावलंही नव्हती.. भारतात सगळीकडे उत्सव चालू होता. तिकडे घरी गणपती बसला होता. आईकडून सगळं फोनवर ऐकत होतो. पण काहीच जाणवत नव्हतं. खूप वेळ मांडी घालून बसल्यावर पायाला मुंग्या येऊन जशी बधिरता येते, तसंच काहीसं मनाचं झालं होतं.
दसऱ्याला केशरी-पिवळ्या झेंडूला बहुतेक माझे डोळे शोधत होते. सारखं अस्वस्थ वाटत होतं. आपट्याची पानंही कुठे दिसली नाहीत. माझ्या टेबलवर दहा डॉलरची नोट खूप दिवसांपासून पडून होती. संध्याकाळी सहज ती हातात घेतली. तेव्हा पैशाच्या राक्षसाने दसऱ्याच्याच दिवशी त्याच्या दहा तोंडांसकट मला दर्शन दिल्यासारखं वाटलं!

कोरडी दिवाळी तर मनाला अक्षरशः चटका लावून गेली. दिवाळी माझी सगळ्यात लाडकी. त्यामुळे सगळंच खूप प्रकर्षाने जाणवू लागलं. माझा जन्मही दिवाळीतला. खूप प्रदूषण होतं, हे बुद्धीला कितीही पटत असलं तरी मला फटाक्यांचे आवाज लागतातच! 'फटाक्यांविना दिवाळी' वगैरे माझ्या कल्पनेच्याही पलीकडची होती. आता तर मी ते प्रत्यक्ष अनुभवत होतो! साधा एक लवंगी फटाकाही नव्हता हो! डोळ्यांना स्वतःकडे बघायला लावणाऱ्या त्या असंख्य पणत्या नव्हत्या. पणत्या मला नेहेमी ७-८ वर्षांच्या, परकर-पोलकं आणि केसांचा बो घातलेल्या मुलींसारख्या वाटतात. त्या चिमुकल्या तोंडातून, गोड आवाजात सतत बडबड करणाऱ्या.. वारा आला आणि पणत्यांची ज्योत फडफडली, की त्या पोरींची बडबड वाढते! त्या पणत्यांचीही खूप आठवण येत होती. घराबाहेर आकाशकंदील नव्हता. उटणं लावून अभ्यंगस्नान नव्हतं. ओवाळणं नव्हतं की नातेवाईकांना भेटणं नव्हतं... घरून दिवाळीचा फराळ आला होता, पण त्याला दिवाळीपणच नव्हतं. लाडू, चिवडा, चकली, सगळंच छान झालं होतं. पण तेव्हा ते नुसतेच पदार्थ होते. त्याचं फराळत्वच हरवलं होतं..

दुसऱ्या वर्षी ठरवलं की परत असं होऊ द्यायचं नाही. त्या गणपतीत स्वत:हून enjoy करायचा प्रयत्न केला. सगळे मित्र जमलो. जेवणाचा खास बेत केला. एवढंच नाही तर 'You Tube' वर गणपतीच्या आरत्या ऐकल्या आणि विसर्जनाला मिरवणुका बघितल्या. दिवाळीत झब्बा-सलवार घालून Indian Student Association च्या cultural program ला गेलो. दिव्यांची माळ आणून घरासमोर लावली. आणि एवढं सगळं करून मग घरून आलेला फराळ खाल्ला.. पण कशाचाच फारसा उपयोग झाला नाही.

'हे असं सगळं का होतं?' असा विचार करत असताना अचानक 'tube पेटली' आणि एका 'खऱ्या' देवाचं दर्शन झालं! गणपतीची आरास, तबकातला कापूर, निरांजन, रंगपंचमीचे रंग, दहीहंडी, आकाशकंदील, मिरवणुकीतला गुलाल, पणत्यांच्या ज्योती, फटाके, नागपंचमीचा तो टोपलीतला नाग आणि पुंगीवाला गारुडी, नंदीबैल, झेंडू, आंब्यांच्या पानांची तोरणं, गुढी, दारातली रांगोळी... यांसारख्या फारसा काही अर्थ नसलेल्या मानवनिर्मित गोष्टी सण किंवा उत्सव कसे उभे करू शकतात? मनामनात उत्साह पेरून आनंदाची हंगामी पिकं कशी आणू शकतात? एवढं सामर्थ्य त्यांच्यात येतं कुठून? याचं एकमेव कारण म्हणजे या सगळ्या गोष्टींमध्ये ओतप्रोत चैतन्य भरलेलं आहे. आणि हाच तो देव!

घरी माझा नीट अभ्यास होत नसला की मी लायब्ररीत जातो. तिथल्या 'अभ्यासू' वातावरणात मग माझा चांगला अभ्यास होतो. हे वातातावरण तयार होतं तिकडे अभ्यास करणाऱ्या लोकांमुळे. वातावरण हाच तो देव! आई घरी असली की घरातला उत्साह दुप्पटीने वाढतो. घर जणू बोलकं होतं. हाच तो देव! निसर्गाच्या सान्निध्यातलं शांत वाटणं, शिक्षकांच्या सहवासातलं प्रोत्साहित वाटणं, मित्राच्या सहवासातलं हलकं वाटणं आणि प्रेयसीच्या सहवासातलं तरंगणं... हाच तो देव!

मी विचार केला, समजा आत्ता या क्षणी समस्त मानवजात नष्ट झाली. सगळे प्राणी, वनस्पती, कीटक.. म्हणजे सगळेच सजीव नाहीसे झाले तर काय उरेल? ओसाड काँक्रीटचा पसारा उरेल, उजाड जमिनी उरतील आणि इलेक्ट्रोनिक्सचा कचरा उरेल.. सगळं चैतन्य हरपून जाईल.. त्या क्षणासाठी ती पृथ्वीची मृतावस्था असेल..

हा विचार होताच मला संतांच्या शिकवणीचा अर्थ कळला. देव माणसात, निसर्गात कसा असतो, हे उमगलं. मला माझा 'देवबाप्पा' भेटला..!

**- सुशांत खोपकर**




Property & Casualty Done Right.
At Heritage Insurance, we understand the importance of working together with the agent and the homeowner. From the smallest problem to a major disaster, Heritage Insurance will be there for you. We know the importance of building a long-term relationship with our customers. We are committed to a responsive customer service staff that will serve you quickly, and honestly.
Heritage Insurance is a company you can count on to be there when you need us most.
Competitively Priced Products
Efficient Claims Handling
Recognized Financial Stability
Experienced Management Team
Committed to Your Success
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC. AND VIJAY WALVEKAR, ITS DIRECTOR.
HRTG LISTED NYSE
(855) 620-9978
www.heritagepci.com
HERITAGE® Insurance
Pillars of Strength and Character.


shilp
Gaata Rahe Mera Dil...
the iconic melody of
SACHIN DEV BURMAN
The Musical Journey of a composer who we can truly call an architecht of golden era of Bollywood Cinema
19 Nov | 5 PM
Ford Performance Theater,
Dearborn, MI
Script & Narration: Salim Arif Concept: Madan Kulkarni Director: Milind Oak
Feat: Vibhavari Joshi, Hrishikesh Ranade, Jitendra Abhyankar & Swarada Godbole
with Kedar Paranjape & his remarkable orchestra
Group Discounts Available
Tickets
shilpentertainment.com/grmdetroit
248-923-1078
Also available at
Sai Sweets
Pande

# तुझ्याबीन लहरी

(चाल: मोह मोह के धागे, दम लगाके हैशा)

लहरी वरून लहरी, मन्मनी तुझ्याबीन उठती
फेसाळती त्या किनारी, थयथयाट कधी त्या करीती
ह्या रोम रोमच्या लहरी, ह्रदयास पिळूनी जाती
तुझा मी इतका वेडा, काय सांगू ग तुला
जसा एक बुडबुडा, फेसाळला, तरसला!
ह्या व्यथा, माझ्या कथा, कश्या सांगू ग मी कुणा?

असे बेपरवाह मन, माझे न झाले
समजले जर कां कुणा, असा एक मला, हा भया
ह्या गोष्टी, मना मधी जाती येती, वेडूनी टाकी ग मला

- **निरंजन हुंबड**

**(This song is also available on Soundcloud at the following link**
https://soundcloud.com/niranjan-humbad/moh-moh-ke-dhaage-karaoke-tuzyabin-lahri

# साधं, सहज आयुष्य मी जगतो...



लहानपणी च नाही तर अत्ता अत्ता पर्यंत,
किती स्वप्नं पाहिली स्वतःबद्दल,
आड वळणाच्या वाटा जागवण्या बद्दल ,
यशाची शिखरं सर करण्या बद्दल...
पण आयुष्याला कदाचित तो ठसका नको वाटतो,
अन हे आळणी, साधं आयुष्य मी जगतो...

बघतो मी स्वतःला 'नायक'; चा अनिल कपूर होताना,
गोर-गरीब जनते साठी जीव तोडून काम करताना,
भ्रष्टाचार, अन्यायाला समूळ नष्ट करताना,
शिवरायांना आदर्श मानून त्यांच्या मार्गाचं अनुकरण करु बघताना,
पण खरं तर मी सद्विवेकाने क्वचितच मतदान करतो,
असं साधं, सहज आयुष्य मी जगतो...

बघतो मी स्वतःला काश्मीरी खोऱ्यात गस्त घालताना,
सियाचीन च्या दुर्धर सीमेचं प्राणपणाने रक्षण करताना,
'विराट' विक्रमादित्य; वरून माझं लढाऊ विमान उडवताना,
Captain होऊन युद्धनौकेला दिशा देताना,
पण खरं तर सामाजिक वादांमध्ये सत्याच्या रक्षणासाठी ना मी कधी उतरतो,
असं साधं, सहज आयुष्य मी जगतो...

कधी बघतो मी स्वतःला लाल-दिव्याच्या गाडीतून येताना,
तर कधी वैज्ञानिक होऊन ISRO चं successful mission celebrate करताना,
तर कधी समाज-सेवक होऊन स्वार्थ-त्यागून आदिवासींची सेवा करताना,

पण मग आजूबाजूच्या computer आणि keyboard चा खडखडाट स्वप्नांतून जागं करतो,
अनेकांनी चालून झिजवलेलीच वाट मी चालतोय याची जाणीव करतो,
माझ्या देशाचं, समाजचं ऋण कसं फेडू या विचारांनी मी गुदमरतो,
पण कुटुंबाच्या जबाबदारी साठी, वाढत्या गरजांसाठी
तोच keyboard चा खडखडाट मी पण करायला लागतो,
असं साधं,सहज आयुष्य मी जगतो...

**-Vedanti Pargaonkar**

# Khatri Sir and Gymnastics

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

I was extremely anxious. This return journey on Chaddar trek (walking on the frozen Zanskar River in Ladakh) had turned into a huge challenge. At one point on a long icy treacherous patch, despite all precautions, I finally had a spectacular Charlie Chaplin style fall. My legs slipped, for a fraction of a second I noticed that my entire body was 3-4 ft up in the air, and then I came crashing down. But within five minutes, I was back on my feet limping along in pain, cracking jokes and taking photos. At the camp that evening, one fellow trekker asked me, “How the hell do you manage this pain, man?” I told him, “There is simple one word answer: Khatri-sir.”

Khatri sir…. barely five foot, stocky guy. Baldy, clean-shaven Gurkha face. Classic army person, rough and tough, chain smoker, one who would not tolerate any jokes and would never smile. Almost always, he would wear a brown T-shirt and grey pants, as if these clothes were part of his stocky body itself. Yes, he was our Gymnastics coach in IIT-Bombay.



I was a freshie when I saw Khatri sir for the first time. I was wandering around the gymkhana, and heard someone screaming, “Thirty more seconds… Thirty.., Twenty nine...” Five pathetic souls were lying flat on their backs and were trying desperately to hold their legs at a 60 degree angle clenching their hands with quivering bodies. Khatri sir was also clenching…. his chappal in his hand, and was ready to hit anybody who failed to hold their position. I wondered, “What the hell is going on? What kind of suckers would want to endure this torture?” When Gymnastics session ended, I happened to chat with Khatri sir. He told me in his crude Hindi, “One day, you will become a big sahib in your life. You will encounter lots of stress and pain. At that time, you will remember Gymnastics and me. You will learn to “enjoy” pain.” Wow! What a philosophy!

Guess what? The next day, people saw one new guy trying to hold his position clenching his hands and getting hit by Khatri sir’s chappal. A new sucker had joined Khatri’s team.

His methods of fixing our injuries and health problems were also crude, ruthless and consistent with his philosophy of training students to “Enjoy the life while in pain”. We were preparing for the Inter-IIT meet in Delhi in 1979 (I think!). Sudhir was a sure shot gold medal winner for the horizontal bar with his fancy grand circles. But ten days before the competition in the sports camp, he developed a huge blister on his palm. He was in pain and could not bear to perform grand circles any more. One fine morning, before anybody could realize, Khatri sir ignited some newspaper (with his cigarette lighter, of course) in his bare hands and pressed the burning wad hard into Sudhir’s palm. Holy cow!! Sudhir screamed, we were in shock, we could not believe our eyes. And Khatri sir in his calm voice said, “Everything will be fine.” Yes, the blister did open up, Sudhir was rushed to the hospi, they did dress up his wounds with bandages, and in the end, Sudhir actually ended up performing grand circles on horizontal bar while in freaking pain.



In another sports camp, many other coaches (Hockey, Football, Basketball etc.) had to go to the city for some conference. Early in the morning at 7 am, they handed over their boys to Khatri sir and said, “Khatri saab, can you please get the boys to do some warm-up? After that, they will go and practice their own games.” Neither the coaches nor their students were aware of what they were getting into. Khatri sir’s standard warm-up used to be so intense! 800 m sprint, tens of two-hand and one-hand push-ups (yes, one-hand push-ups are possible when Khatri sir is standing next to you with a chappal in his hand), hundred sit-ups, going up and down on MB (main building) staircases… all of these in just 45 min while Khatri sir is screaming at top of his voice. It was inevitable that after this “Khatri warm-up”, one could barely stand on his own legs. Obviously, instead of “practicing their own games”, all these teams staggered back to their own hostel rooms to rest.

So, that was Khatri sir… a terrorizing coach, and his blood-curdling, horrific incidents! Over time, however, one could start to understand another, more compassionate side of his character. We all were somewhat awkward, physically little too matured individuals for Gymnastics, who had suddenly discovered our love for this sports, may be a dozen years too late. Even learning the simplest exercises was a struggle. But even as a 60 year old, Khatri sir provided firm physical and mental support to ensure that we are not injured during training. Imagine leaping backward during a back flip or a back somersault with a real danger of landing on your head or your neck with a potential body-crippling injury. But over time, we developed complete faith in Khatri sir to protect us, sometimes risking himself in the process. Even now in our fifties, when Suhas can still do a back flip, Sanjiv can do a press hand-stand, I can harden my tummy to withstand hard hitting punches from my kids, or even when we reach our professional meetings on time, we remember Khatri sir!
Despite his tough demeanor, he definitely tolerated pranks by some of us, especially Milind. Occasionally, Milind would disappear in the middle of Gymnastics session. Sometimes, we

used to disappear with him as well. Some of our craziest surreal experiences in IIT happened along with Milind during such disappearances.


For example, how many IITans have experienced catching fish in overturned umbrellas? Or how many of you have actually caught, cooked and eaten multiple animals in one meal? During first monsoon showers, fish would start moving upstream from Powai lake through the drainage canals near Hostel 8. This canal flowed under the road through a culvert. Fish would have to leap up into the culvert just to continue their upstream journey. Under Milind's leadership and innovation, many of those ambitious fish landed up in cleverly positioned overturned umbrellas and later on our dinner plates. How can this innovation be any less profound than Heisenberg's uncertainty principle that we were learning in PH301 during the same summer? Incidentally, during that same summer, we caught, cooked and ate crabs and frogs as well! (But that is another profound and long story!!)

Well, unfortunately gone are those days! And gone is Khatri sir! Couple of years after our graduation, we heard that Khatri sir was sick with rapidly progressing throat cancer. We all went to meet Khatri sir at his home on the IIT campus. His eyes were weak. He had lost his voice, lost his fight. He could barely lift his hand. His forced smile filled us with sadness. His stocky body frame was gone, crude Hindi was gone, this constant fixture of Khatri sir in our lives was fading away. We were not used to seeing Khatri sir in this manner! He was trying to write on the nearby crumpled paper, "Stay well!" And we, a bunch of twenty year old kids, were facing teary emotions that we were not familiar with.

Sir, after thirty years, we are staying well, enjoying pains of our lives, occasionally remembering you, remembering those days…! As Milind says, "बंदर बुड्ढा भी हो गया तो भी गुलाटी मारना नहीं भुलता।" (However old a monkey is, he doesn't forget his tricks!)

- Nitin Anturkar

(This article was published in a previous Snehabandha issue. However, due to relevance of the subject to the overall theme of the issue we are publishing it again for the readers.)




**SIMPLE, COMPLETE, COST-EFFECTIVE SOLUTIONS THAT IMPROVE ELECTRONIC COLLABORATION BETWEEN GLOBAL PARTNERS.**

iConnect's suite of electronic commerce and EDI solutions includes EDI in the Cloud, Value Added Network Services, iExchangeWeb - Web EDI, Supply Chain Management, Data Transformation Services and XML Data Services. iConnect provides for the successful transformation and secure delivery of business critical information between organizations irrespective of data format, technology and language. **Visit iconnect-corp.com or call 877-327-9334 to learn more.**

iConnect

# 'ब्रिज' याने की पूल - खेळातला आणि मैत्रीतला

लहानपणी खेळलेले खेळ, केलेला दंगा आठवलं की I am so glad I had a childhood before technology took over…. या उक्तीची सत्यता मनोमन पटते. शाळेच्या अभ्यासाची पाटी एकदाची टाकली की दिवसभर घराबाहेर खेळ आणि हुंदडक्या. "बाहेर गिळायला मिळत नाही म्हणून घरात येता".... वगैरे आईबाबांची टिपिकल वाक्य.... शोलेतल्या "शायद ही कोई ऐसा जेल हो, उसमे ये दोनो ना गये हो" संवादाच्या चालीवर "शायद ही कोई ऐसा खेल हो, जो हम ना खेले हो"...

कबड्डी, खो-खो, सूरपारंब्या, डबडा-ऐसपैस (हे नाव ठेवणाऱ्याची धन्य आहे), गोट्या, भोवरे, लगोरी, खांब-खांब-खांबोळी, अंडा-चोर (हे नाव ठेवणाऱ्याची ही धन्य आहे), काठी-डाव, रूपणी-डाव (हे खेळ माहित असायला बालपण कोकणात गेलेलं असावं लागतं).... माझं बालपण पालघरला गेलं; कि जिथे पावसाळ्यात सरासरी १०० इंच पाऊस पडतो/पडायचा; त्यामुळे पावसाळ्यात बाहेर खेळायला मिळालं तर रूपणी-डाव हा एकच पर्याय असायचा.... अन्यथा कॅरम, पत्ते, व्यापार, बुद्धिबळ असे बैठे खेळ असायचे. बुद्धिबळाच्या खेळात 'बुद्धी' आणि 'बळ' या दोन्ही आघाड्यांवर आनंद असल्याने प्रगती बेताचीच....चुकून समोरच्याचा वजीर मारता आला तर मग अंगात बळ संचारायचे. पत्त्यांमधे 'कनास्ता' नावाचा एक खेळ असायचा; जो कितीही जण आणि पत्त्यांचे कितीही जोड घेऊन खेळता यायचा....more the merrier. पत्त्यातला 'तीनशे-चार' हा खेळ शोधून काढणाऱ्याचं खरंच कौतुक करावं तेवढं थोडं आहे. या खेळात गुलाम्याला जास्त महत्व आणि मार्क असायचे, राजा-राणीचं 'मॅरेज' असायचं, हुकमाच्या 'मॅरेज' ला जास्त मार्क असायचे, डावात शेवटचा हात (last hand.... हे शब्दशः भाषांतर रूढ होतं) करणाऱ्याला मार्क मिळायचे. प्रचंड बेरजा-वजाबाक्यांचा व तेवढीच धमाल येणारा हा खेळ तास-न-तास खेळत बसायचो. तसाच तो 'मेंढीकोट' नावाचा खेळ...या डावात 'दहली' ला जास्त महत्व असायचं.... केलेल्या हातांमधे जितक्या जास्त दहल्या, तितके मार्क जास्त. चारही मिळाल्या की 'कोट' व्हायचा. 'तीनशे-चार' आणि 'मेंढीकोट' सारखे थोडेफार डोक्याचे खेळ खेळून 'ब्रिज' खेळायला लागणारी तयारी झाली होती.



माझे बाबा 'ब्रिज' खेळाचे प्रचंड शौकीन.... अगदी competitive, tournaments वगैरे खेळायचे. सहसा घरांमधे पत्त्याचा एखाद-दुसरा कॅट असतो; आमच्याकडे अक्षरशः बावन्न कॅट्स असायचे. बाबा उत्साहाने 'ब्रिज'च्या स्पर्धा भरवायचे. Epson वगैरे सारख्या स्पर्धांचे डाव वाचून, त्याप्रमाणे पत्ते लावून वाटायचे, त्यामुळे प्रत्येक टेबलवर खेळणाऱ्या लोकांना सारखीच पानं आलेली असायची. अशा रीतीने 'card luck' चा 'पत्ता कट' करून प्रत्येक टेबलवरच्या टीमची बुद्धीची कसोटी व्हायची. बाबा तर खेळात नसले तरीही, केवळ 'कॉलिंग' ऐकून; कोणाकडे काय पानं असतील याचा बरोब्बर अंदाज बांधायचे, एवढंच काय पहिल्या उतारीचं पानसुद्धा बऱ्याचवेळा आधीच ओळखू शकायचे. मला बाबांबरोबर खेळायचा फार योग आला नाही.... त्यांनी शिकवायचा प्रयत्न केला पण त्यांच्या प्रचंड expertise चं किती नाही म्हंटलं तरी दडपण यायचं. आजकाल अंतुरकरांबरोबर खेळतांना एखादा डाव मस्त झाला असेल तर दुसऱ्या दिवशी त्यांना फोनवर डावाचं वर्णन ऐकवतो. नुसत्या फोनवरच्या संभाषणातूनसुद्धा बाबांना पत्ते व्यवस्थित ओळखू येतात, कोणी काय चाल खेळली असेल बरोबर ओळखतात.

'ब्रिज' हा 'बावन्न पानी, चार हाती', म्हणजेच एक कॅट घेऊन चौघांनी खेळायचा खेळ आहे. या खेळाचे वेगवेगळे प्रकार, पद्धती आहेत. आम्ही अंतुरकरांबरोबर खेळतो त्या प्रकाराला rubber bridge किंवा contract bridge म्हणतात. माझे बाबा खेळायचे त्याला duplicate bridge म्हणतात. duplicate bridge प्रकारात 'card luck' चा मुद्दा निकालात काढलेला असतो एवढाच फरक. contract bridge चा ढोबळ मानाने अर्थ असा 'मी आणि माझा पार्टनर मिळून (हो... समोरासमोर बसलेले दोघं या खेळात पार्टनर असतात) अमुक एक हात करणार आहोत आणि हा आमचा या डावातला हुकूम (trump) आहे.' या खेळात पत्त्यांना मार्क्स किंवा counts असतात. एक्का चार, राजा तीन, राणी दोन, गुलाम एक असे counts. त्यामुळे डावात एकूण जास्तीत जास्त ४० counts असतात. चौघांमधे तेरा-तेरा पानं वाटून झाली की bidding किंवा calling ला सुरवात होते. ही सुरवात जो पत्ते पिसतो त्याच्यापासून करतात. सर्वसाधारणपणे आपल्या हातात १३ तरी counts असल्याशिवाय बोलायला सुरवात करत नाहीत. १३ counts नसतील तर 'पास' म्हणून पुढच्यास bidding ची संधी दिली जाते. अपवाद म्हणजे तुमच्या पार्टनरने bidding ला सुरवात केलेली आहे तर अशा वेळेला तुमच्याकडे supporting hand म्हणून ६ ते ८ counts असूनसुद्धा पुरतात. bidding सहसा एक क्लब, एक हार्ट, दोन डायमंड, दोन स्पेड, तीन डायमंड, तीन नो-ट्रम्प अशी वळणं-वळणं घेत पुढे सरकतं. जेव्हा एखाद्या bidding नंतर उरलेले तिघं 'पास' म्हणतात तेव्हा तो कॉल



'stand' झाला असं म्हणतात. समजा 'चार स्पेड' चा कॉल 'stand' झाला तर याचा अर्थ कि ती कॉलिंग टीम स्पेड (इस्पिक) च्या हुकुमाने डावात चार अधिक सहा असे एकूण दहा हात (तेरा पैकी) करणार. 'पाच डायमंड' चा कॉल 'stand' झाला तर डायमंड (चौकट) हुकूम आणि पाच अधिक सहा असे अकरा हात करायचे. पट्टीचे खेळणारे bidding सुरु झाल्यावर 'कॉल्स' शिवाय बाकी काही बोलणं निषिद्ध मानतात.... आमच्या इतरही गप्पा चालू असतात हा भाग अलाहिदा. ज्या टीमचा कॉल 'stand' होतो त्यांच्यातला, ज्याचा original call असतो तो lead घेतो; त्याचा पार्टनर 'dummy' होतो आणि त्या पार्टनरचे पत्ते खाली टेबलवर मांडले जातात. अशा प्रकारे एका वेळी प्रत्येकाला स्वतःच्या हातातील १३ पानं, 'dummy' तली १३ पानं अशी २६ पानं नक्की दिसत असतात. उरलेल्या २६ पानांचा, calling च्या आधाराने व्यवस्थित हिशेब करत प्रत्येक चाल चालावी लागते. 'नो-ट्रम्प' म्हणजे बिन-हुकमी डाव. या डावात तुमच्या स्मरणशक्तीची, केवळ कॉलिंगवरून 'कोणाकडे काय पानं असतील' हे ओळखायच्या आकलनशक्तीची खरी कसोटी लागते. या डावात हुकूम नसल्याने दुर्री सुद्धा सर होऊन हात होऊ शकतो. कधी कधी counts ची साधारण समसमान वाटणी होऊन कोणाकडेच १३ पेक्षा जास्त counts नसतात. अशा वेळेस डाव मोडून नव्याने पत्ते पिसायाला सुरवात करतात.

"सगळ्याची सोंगं आणता येतात counts चं नाही". आवाज चोरून गाऊ नये तसं "counts लपवून बोलू नये". असे ब्रिजच्या खेळातले काही वाक्प्रचार आहेत. 'second the lowest, third the highest', 'when in difficulty, play trump' असे काही ठोकताळे आहेत. 'Preemptive Bidding' सारखे 'पायात पाय घालून पाडायचे' प्रकार पण आहेत. प्रतिस्पर्धी टीमच्या एखाद्याचं bidding कळलं नाही किंवा वेगळं वाटलं तर त्याच्या पार्टनरला विचारायची मुभा असते. 'The game is not over until the last card is played' हे खेळाचं सूत्र आहे. एकंदरीतच या खेळात करमणूक, मनोरंजनाबरोबरच बुध्दीलाही चालना मिळते….Gray Cells Matter!

.

**- संजय मेहेंदळे**

## Central Home Health Care, Inc.

20245 W. 12 Mile Road, Ste. 100 Southfield, MI 48076
Tel: 1-800-698-5410 Fax: 248-569-5412
http://www.centralhomecare.com
Founded January 1985
Joint Commission accredited since 1991
Full time or contingent positions available for
Registered Nurses and Physical Therapists.

## Taal Academy

Learn the versatile Indian classical Kathak Dance

With

Manisha Dongre

Locations:
Bharatiya Temple, Troy & Hindu Temple, Canton

***** Special batches for Adults and Moms *****

Contact: Manisha Dongre at 248-740-5915
www.manishadongre.com

# मैदान

**पार्श्वभूमी:**
तुम्हा-आम्हा सर्वांचं बालपण खेळण्यात कसं विरून गेलं ते कळलंच नाही. जसा जसा वयाचा काटा पुढे सरकत गेला खेळ, खेळाची मैदाने, आणि त्यातली मानसोक्तता नकळत दूर दूर गेली. कधी अभ्यास, कधी करिअर goals, कधी घरातली कामे, तर कधी आळस... हे सारेजण पाळीपाळीने खेळ आणि आपल्यामधे मध्ये एक भिंत बनून उभे राहिले. एका सायंकाळी ऑफिस मधून थकून-भागून घरी येताना मैदानावर बेधुंद खेळणारी- बागडणारी मुलं दिसली आणि आपण काय miss करत आहोत ह्याची जाणीव झाली. असं वाटलं या 'ऑफिसच्या थकव्या' ऐवजी तो 'खेळाचा थकवा' exchange offer मध्ये मिळेल का? ऑफिसची बॅग पाठीवर घेऊनही नकळत मी मैदानाकडे चालू लागलो. त्या हिरव्यागार मैदानावरून जणू माझं बालपण, मैदानावर खेळलेले असंख्य खेळ आणि अगणित सवंगडी हे सारे मला आवाज देत होते.



देवा मजसी परत तू ने रे, त्या हिरव्या मैदानावर
किती विविध ते खेळ खेळेले, रंग चढवले बालपणावर.

खेळ खेळले शिवाशिवीचे, विष-अमृत अन चेंडू-फळीचे,
लपंडाव कधी, कधी लगोरी, नियम सारे आपल्या मनीचे.

कितीदा पडलो, गुडघे फुटले, रक्तबिंदु काळ्या मातीत विरले,
क्षणभर दुखले पण क्षणात विसरले, खेळापुढे ते मातीमोल ठरले.

कधी हरलो, कधी जिंकलो, कधी डाव-रडीचा खेळून हसलो,
भांडलो कधी, कधी बिलगलो, मैदानावर त्या थकुनी पडलो.

किती गोंधळ, किती आरडा-ओरड, इवल्या खुशीत मन बेधुंद नाचले,
संघ बनवले, दोस्ती केली, मैत्रीचे मधकण नकळत वेचले.

डाव रोजचाच, पण कंटाळा कुणाला?.. धूंदीत वेगळ्या, तो क्षण जगला,
धावले मजसंग सुख-दुख तेथे.. भावनापुंज माझा घामातच भिजला..
'कपिलदेव होणार' 'तेंडुलकर होणार' कित्येक स्वप्ने दररोज रंगली
आज ऑफिसची बॅग मलाच विचारते, "का रे मित्रा कधी ती भंगली?"
खरंच … ते निरागस वेड, ती स्वप्ने, आज कुठे हरवले?



"ये सख्या पुनः इथे रे", जणू मैदान हिरवे मजसी करी इशारे
"संभ्रम का रे? बेभान धाव तू"... पैज लाविते हे हिरवे वारे.

मग वाटते:
देवा मजसी परत तू ने रे, त्या हिरव्या मैदानावर,
स्वच्छंदपणे खेळ खेळुदे, स्वार होऊनी चैतन्यावर,
हसुदे, रडुदे, डाव आखुदे, मन-मौजी होऊनी क्षणभर
सवंगड्यांसह पुन्हा चढुदे, बालपणाच्या त्या रथावर!

**- ऋतूज देशपांडे**

# कृष्णा

परवाच  कुणीतरी WhatsApp वर रांगोळी चा फोटो फॉरवर्ड केला होता. कृष्णाची बासरी वाजवतानाची ती सुंदर रांगोळी होती. रांगोळीच्या वर लिहिले होते "श्री कृष्णाय नमः". 'कृष्णा' म्हटल्यावर एक जुनी आठवण जागृत झाली. ह्या गोष्टीला आता तीसपेक्षा जास्त वर्ष झाली असतील.

मी नेहमीप्रमाणे मुंबईला बहिणीला फोन लावला. लगेच excitement मध्ये तिने चालू केले, "अग शमा, काल काय धम्माल झाली माहित आहे?" आपल्या CNN च्या जशा सर्व news ब्रेकिंग news असतात, तशी माझ्या बहिणीची प्रत्येक गोष्ट "धम्माल झाली" नेच सुरु होते. "काय, लवकर सांग. हा इंटरनॅशनल कॉल आहे मीटर पटकन वाढतो." पण ही गोष्ट मात्र खरंच धम्माल होती. तिच्याच शब्दात सांगते.



अगं काल ना मी मुलांच्या शाळेच्या admissions घ्यायला गेले होते. तिकडे एवढी मोठी रांग होती आणि त्यात मरणाची गर्मी. पण नंबर येईपर्यंत रांगेत उभे राहणे याशिवाय उपाय नव्हता. तरीसुध्दा माझ्या पाठच्या बाई बरोबर गप्पा मारून टाईम पास करत होते. इतक्यात एक विशीतला मुलगा माझ्या जवळ आला आणि मला म्हणाला, "बाई तुम्हाला सायबांनी आत बोलावलं आहे." मी त्याला विचारले. "कोण साहेब? कशाला बोलावले आहे माहित आहे का?" तर तो काही बोलला नाही. मनात विचार करीत होते कोण हा त्याचा साहेब आणि कशाला मला आत बोलावलं असेल? ह्यांच्याबरोबर जावं तर आपला नंबर जायचा आणि पुन्हा येऊन ह्या लांब रांगेत उभं राहायचं म्हणजे admissions ची खात्री नाही. पण ती मागची गप्पा मारणारी बाई म्हणाली, "जा तुम्ही जाऊन या. मी तुमचा नंबर ठेवते. मी तिला "थँक्यू" म्हटलं आणि त्या मुलाबरोबर चालू लागले."

त्या मुलाने मला शाळेतल्या एका ऑफिसमध्ये नेले. तिथे एक सावळ्या वर्णाचा मनुष्य हात जोडून हसत उभा होता. मला पाहून तो म्हणाला, "बसा. अमलमाई मला ओळखलंत का?" मी म्हटलं, "चेहरा परिचयाचा वाटतो पण नाही लक्षात येत." त्यावर तो म्हणाला, "मी कृष्णा. माझी आई आनंदी तुमच्या कडे काम करायची आणि तुमच्या आईनेच मला शाळेत घातला आणि त्याच माझी फी भरायच्या. आमच्याकडे पाणी येत नव्हतं तेव्हा आम्ही तुमच्या बाथरूम मधेच अंघोळ करायचो आणि प्यायचं पाणी पण तुमच्या कडूनच न्यायचो." माझी लगेच tube पेटली. तो छोटासा आनंदीचा पदर धरून येणारा कृष्णा डोळ्यासमोर आला. मी म्हटलं, "अरे तू मला लहानपणीचा आठवतोस, पण आता मी तुला लगेच ओळखू शकले नसते."

त्याने मला विचारले, "चहा प्याल की ठंडा मागवू?" मी म्हटलं, "अरे मी मुलांच्या ऍडमिशन च्या चिंतेत आहे. ती झाली का मग बघू." तसा म्हणाला, "अमलमाई तुमच्या मुलांची ऍडमिशन झालेली आहे. ते सर्व फॉर्म्स माझ्याकडे द्या . मी इथला regional education इन्स्पेक्टर आहे." मग तो त्याची कथा सांगू लागला. त्याने SSC पास केल्यावर त्याला कॉलेजला जायला freeship मिळाली. त्याने नंतर MA केलं आणि education बोर्डात तो नोकरीला लागला. वरती चढत चढत regional inspector झाला.

मी त्याला म्हटलं, "आईला जाऊन दोन वर्षं झाली . तिला तुझी प्रगती पाहून खूप आनंद झाला असता. बाबा माझ्याकडे असतात." त्याने माझा पत्ता , फोन नंबर घेतला आणि म्हणाला, "मी बाबांना भेटायला लवकरच येईन." मनात विचार

आला बाबाना ही गोष्ट न सागितलेलीच बरी. नाहीतर म्हणतील, “वशिला लावून कशाला ऍडमिशन घेतलीस?” पण मी काही मुद्दाम वशिला लावायला गेले नव्हते. वशिलाच माझ्याकडे चालून आला होता.


नंतर अमलने मला ‘कृष्णा आठवतो का’ म्हणून विचारलं. मी म्हटलं, “मला साधारण आठवतो आहे, पण त्याच्यापेक्षा मला आठवतं ते म्हणजे आंब्याच्या season मध्ये आई आपल्याला सांगत असे, “अगं शेवटचा आंबा उरला आहे, तो कृष्णासाठी ठेवला आहे. आपण त्याला नाही दिलं तर तो कुठून खाणार?” “मला आंबा तेवढा आवडत नसे त्यामुळे मला काही वाटत नसे . तू मात्र हिरमुसला चेहरा करून आईला सांगायचीस. पुढच्या वेळेस जरा जास्त आंबे घे. पण तो शेवटचा आंबा खायची तुझी कधी हिम्मत झाली नाही.”

काही लोकांना त्याचं ऋण फेडायची संधी त्याच जन्मात मिळते, पण काहींना दुसरा जन्म घ्यायला लागतो. गेल्या जन्मीचे ऋण फेडलं हा वाक्प्रचार त्यामुळेच अस्तित्वात आला असावा.


-

- **शमा सुखटणकर**




Happy Diwali
Wishing You and Your Family a lot of
Happiness, Prosperity and Sparkling Diwali

Sustaining. Nurturing. Growing




## Our Vision

"To be a trendsetter who believes in proactive implementation of technology based on market foresightedness and to be respected as a leading brand in imbibing India's vision of 'Housing for all by 2022'"

## Our Mission

"To provide a transparent environment through an empowered team which believes in creating honest & innovative lifestyle opportunities for all the customers"

## Our Core Values

Our Group's values, Excellence(We Strive for excellence), Integrity (We Live Integrity), Gratitude, Celebration (We Celebrate each moment ) and Social Compassion are an integral part of our guiding philosophy.